कोळशेवाडी व मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/२५३/२०२५ दि. १५/११/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रांतर्गत कोळसेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये टाटा प्रोजेक्ट लिमीटेड कंपनी मार्फत Express Freight Railway Consortium Dedicated Freight Corridor Project (JNPT-Vaitarana Section of Western Corridor Phase-2) Civil, Building and Track Works Contract Package- CTP-11 या प्रोजेक्टचे काम चालु आहे. सदरचे काम राज्य महामार्ग क्र. ७६, लोढा पलावा एक्सपिरीया मॉल जवळ, कल्याण शिळ रोडवर कल्याण कडून शिळफाटाकडे जाणाऱ्या वाहीनीवर होणार असून, निळजे रेल्वे ओव्हर ब्रिजची उंची कमी असल्याने सदर ठिकाणाहून डी.एफ.सी.सी. च्या डबल डेकर कंटेनर वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे सदर ब्रिज तोडुन नव्याने ब्रिज तयार करण्यात येणार आहे.

सदरचे काम दिनांक १६/११/२०२५ रोजी ००:०१ वा. पासुन ते दिनांक ३१/०३/२०२६ रोजी पावेतो रात्री २४:०० वा. पावेतो करण्यात येणार आहे. त्यामुळे परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद :–	**१)** कल्याण कडून शिळफाटयाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कल्याण शिळ रोड, निळजे कमानीजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग :–	सदरची वाहने निळजे कमान जवळून उजवीकडे वळण घेवून लोढा पलावा कडून कल्याण कडे येणाऱ्या वाहीनीवरून महालक्ष्मी हॉटेल पर्यत जावून पुढे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद :–	२) लोढा पलावा, कासाबेला, लोढा हेवन, एक्सपिरिया मॉल कडुन कल्याणकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **निळजे ब्रिज चढणीला, एक्सपिरिया मॉल बाजुला कल्याण शिळ रोड, कल्याण कडे** जाणाऱ्या **वाहीनीवर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग :–	सदरची वाहने कल्याण शिळ रोडने शिळफाटयाचे दिशेने जावून देसाई खाडी ब्रिज पार करून सरस्वती टेक्सटाईल समोरून उजवीकडे वळण (युटर्न) घेवुन नविन पलावा फ्लायओव्हर ब्रिजवरून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद :–	३) मुंब्रा, कल्याण फाटा कडून कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी व जड–अवजड वाहनांना मुंब्रा वाहतूक उप विभागाच्या हददीत **कल्याण फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग :–	सदरची ६ चाकी व जड–अवजड वाहने कल्याण फाटा – शिळफाटा – मुंब्रा बायपास – खारेगाव टोलनाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद :–	४) कल्याण कडून मुंब्रा कल्याण फाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, जड–अवजड वाहनांना **काटई चौक (बदलापुर चौक)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग :–	सदरची ६ चाकी व जड–अवजड वाहने काटई चौक (बदलापुर चौक) – खोणी नाका – तळोजा एम.आय. डी. सी. मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद :–	५) नवीमुंबई तळोजा एम.आय.डी.सी मार्गे खोणी नाका, निसर्ग हॉटेल येथून काटई/बदलापूर चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी व जड–अवजड वाहनांना **खोणी नाका, निसर्ग हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग :–	सदरची ६ चाकी व जड–अवजड वाहने खोणी नाका, निसर्ग हॉटेल येथे उजवे वळण घेवून बदलापूर पाईप लाईन – नेवाळी मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद :–	६)अंबरनाथ, बंदलापूर कडून बदलापूर पाईप लाईन रोडने काटई चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या ६ चाकी, जड–अवजड वाहनांना **खोणी नाका, निसर्ग हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग :–	सदरची ६ चाकी व जड–अवजड वाहने खोणी नाका, निसर्ग हॉटेल येथून डीवीकडे वळण घेवून – तळोजा एम.आय. डी.सी. मार्गे इच्छित स्थळी जातील.
१) हलके वाहन पर्यायी रस्ता :–	नवी मुंबई, मुंबई, कडून कल्याण फाटा (मुंब्रा) मार्गे कल्याणचे दिशेने जाणाऱ्या कार, मोटार सायकल स्वार यांनी कल्याणफाटा – शिळफाटा – दिवा – आगासन फाटक – दिवा संदप रोड – मानपाडा, कल्याण शिळ रोड या मार्गाचा वापर करावा.

२) हलके वाहन पर्यायी मार्ग :–	मुंबई, ठाणे कडून कल्याण फाटा (मुंब्रा) मार्गे कल्याणचे दिशेने जाणाऱ्या कार, मोटार सायकल स्वार यांनी नाशिक मुंबई महामार्ग – मानकोली – मोटागाव – डोंबिवली या मार्गाचा किंवा नाशिक मुंबई महामार्ग – रांजनोली बायपास – कोनगाव – कल्याण या मार्गाचा वापर करावा.
३) हलके वाहन पर्यायी रस्ता :–	कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर कडून नवीमुंबई, मुंबई दिशेने जाणाऱ्या कार, मोटार सायकल स्वार यांनी चक्कीनाका – श्री मलंग रोड – नेवाळी नाका उजवीकडे वळून – बदलापूर पाईपलाईन रोड – खोणी नाका – तळोजा एम.आय. डी.सी.मार्गाचा वापर करावा.
४) हलके वाहन पर्यायी रस्ता :–	कल्याण, डोंबिवली कडून ठाणे, मुंबई दिशेने जाणाऱ्या कार, मोटार सायकल स्वार यांनी डोंबिवली – मोटागाव – मानकोली नाका किंवा दुर्गाडी कोनगाव – नाशिक मुंबई महामार्गाचा वापर करावा.

सदरची वाहतूक अधिसूचना **दिनांक १६/११/२०२५ रोजी ००:०१ वा. पासुन ते दिनांक ३१/०३/२०२६ रोजी पावेतो रात्रौ २४:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
मा. पोलीस आयुक्त, मिरा–भाईंदर वसई–विरार.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ ठाणे, परिमंडळ – २ भिवंडी, परिमंडळ – ३ कल्याण,
परिमंडळ – ४ उल्हासनगर, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
प्रत :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.
प्रत :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.